## ❖ अणुयुद्ध टाळणाऱ्या 'योद्ध्या'चे निधन:-

- **अमेरिकेविरोधातील संभाव्य अणुयुद्ध रोखण्यात महत्त्वाची भूमिका बजावलेले सोव्हिएत युनियनचे तत्कालीन लष्करी अधिकारी स्तानिस्लाव पेत्रोव्ह यांचे नुकतेच निधन झाले . .त्यांच्या मुलाने निधनाबाबत माहिती दिली .वर्षांचे होते ७७ ते पेत्रोव्ह यांच्या आयुष्यावर आधारित असलेल्या 'द मॅन हू सेव्हड दि वर्ल्ड' या माहितीपटामुळे त्यांचे कार्य जगभरात पोहोचलेया माहितीपटामध्ये हॉलिवूडचे . कलाकार रॉबर्ट डी निरो आणि मॅटडिमन यांनी काम केले होते; तसेच अनेक पुरस्कारांनी या माहितीपटाचा गौरव झाला होतामॉस्कोजवळ असलेल्या एका छोट्या . त्यांच्या निधनाची बातमी रशियातील सर्वच वृत्तपत्रांनी .गावामध्ये ते राहत होते 'हेडलाइन' केली रशियाच्या लष्करातील ते एक .'हिरो' होते, अशा शब्दांत माध्यमांनी त्यांचा गौरव केला.**
- **सप्टेंबर १९८३ मध्ये मॉस्कोतील 'सिक्रेट कमांड सेंटर'मध्ये पेत्रोव्ह काम करीत होते. त्या वेळी अमेरिकेने आंतरखंडीय बॅलेस्टिक क्षेपणास्त्र डागल्याचा अलार्म वाजला. मात्र, त्याची निश्चित खात्री होत नव्हती. याबाबतची माहिती मिळण्यामध्ये अडचणी येत असल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्या वेळी हा अलार्म चुकीचा असल्याचे स्पष्टीकरण पेत्रोव्ह यांनी दिले. पेत्रोव्ह यांच्या माहितीवर विसंबून सोव्हिएत युनियनने अमेरिकेच्या या कथित क्षेपणास्त्राला अण्वस्त्रसज्ज क्षेपणास्त्राने प्रत्युत्तर द्यायचे टाळले आणि मोठा अनर्थ टळला.**
- **यंत्रणेतील दोषामुळेच चुकीचा अलार्म वाजल्याचा प्रकार घडला असल्याचे स्पष्टीकरण देण्यात आले. इतकेच नव्हे, तर त्यानंतर झालेल्या चौकशीमध्येही हीच गोष्ट अधोरेखित झाली. या घटनेनंतर घडलेल्या प्रकरणाविषयी पेत्रोव्ह यांनी आपल्या कुटुंबीयांनाही कोणतीही माहिती दिलेली नव्हती. अनेक वर्षांनंतर हा प्रकार उघडकीस आला होता.**